# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार क्र.रामाआ/तक्रार/२१/२०१७/नाशिक

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री. सैय्यद अजीज रफिक,<br>रा.घर नं.१३४१, भद्रकाली पोलीस स्टेशन मागे, खडकाळी, नाशिक, ता.जि.नाशिक-४२२००१. | प्रकल्प अधिकारी, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक, ता.जि.नाशिक. |

### विवेचन

१. तक्रारदार यांनी आयोगाकडे दि.११/०३/२०१३ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपिल क्र.८६९/२०१३/नाशिक संदर्भात आयोगाने दिनांक २३/०६/२०१४ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी श्रीमती प्रेमलता कदम यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपिलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीचे निरीक्षण करण्यासाठी लेखी तारीख व वेळ कळवावी आणि अपिलकर्ता यांनी त्या तारखेला जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणानंतर अपिलकर्त्यास नेमकी हवी असलेली रु.२००/- पर्यंतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. आयोगाच्या उपरोक्त आदेशानुसार माहिती न पुरविल्यामुळे अपिलार्थी यांनी दि.१३/०८/२०१४ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीसंदर्भात आयोगाने दि.१७/०३/२०१७ रोजी सुनावणी घेवून पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत:-

प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी श्रीमती प्रेमलता कदम यांनी आयोगाच्या दिनांक २३/०६/२०१४ रोजीच्या निर्णयास अनुसरुन अपिलकर्त्यास माहिती न पुरविल्याने त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये २५०००/-शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांना हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत स्वत: उपस्थित राहून आयोगास सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार दि.१२/०५/२०१७ रोजीचा खुलासा उपायुक्त (समाजकल्याण) नाशिक म.न.पा.नाशिक, यांनी दि.१३/०७/२०१८ अन्वये आयोगाकडे सादर केलेला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की,

१) तक्रारदार श्री. सैय्यद अजीज रफिक, रा.नाशिक यांनी दि.१०/१०/२०१२ रोजी प्रथमत: माहितीचे अधिकाराखली अर्ज केला होता. त्या अर्जात उक्त कार्यालयीन रजिस्टर व इतर दस्तऐवजाची माहिती मागितलेली होती. त्यांना सदरची माहिती जास्त असल्याने समक्ष अवलोकनाकरिता यावे असे जा.क्र./म.न.पा/सु.ज.यो./वशि/७०/२०१२ दि.०१/११/२०१२ तसेच जा.क्र./म.न.पा./सु.ज.यो/वशि/८६/२०१२ दि.०४/१२/२०१२ पत्रांमार्फत कळविण्यात आले होते.
२) सदर पत्रानुसार माहितीचे अवलोकन करण्यासाठी कार्यालयात न येता त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (मु.नि.क.स.) म.न.पा. नाशिक यांच्याकडे अपिल दाखल केले होते. सदर अपिल चालविण्यात येऊन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जा.क्र.म.का./कक्ष-१/३४/२०१३ दि.०१/०१/२०१३ रोजी आदेश पारित करुन उक्त आदेशातील अनुक्रमांक १ ते ४ बाबींची माहिती नियमानुसार शुल्क/फी भरुन १५ दिवसांच्या आत देण्यात यावी. असा

आदेश पारित केला होता. ३) त्या आदेशानुसार त्यांना जा.क्र./म.न.पा./सु.ज.यो./वशि/९९/२०१३ दि.०४/०१/२०१३ अन्वये नियमानुसार शुल्क/फी भरुन सदरची माहिती घेऊन जाण्याबाबत कळविण्यात आले होते. ४) तक्रारदार यांनी सदरची रक्कम भरण्याऐवजी ते दारिद्रये रेषेखालील असल्याबाबत कळवून विनाशुल्क माहिती मिळावी असा अर्ज दि.०७/०१/२०१३ रोजी प्रकल्प अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला होता. तथापि सदर अर्जासोबत अर्जदार हे दारिद्रये रेषेखाली असल्याबाबतचा कोणत्याही पुरावा सादर केलेला नव्हता. यास्तव इकडील जा.क्र./म.न.पा./सु.ज.यो./वशि/११८/२०१३ दि.११/०२/२०१३ अन्वये त्यांना दारिद्रय रेषेखालील असल्याबाबतचे प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणेबाबत कळविले होते. तसेच त्यांनी जर दारिद्रय रेषेखालील असल्याबाबत प्रमाणपत्र सादर केले नसल्यामुळे त्यांचा अर्ज निकाली काढण्यात येईल असे पत्राद्वारे कळविण्यात आले होते. ५) मात्र तक्रारदार यांनी ते दारिद्रय रेषे खालील असलेबाबतचा कोणताही समक्ष पुरावा सादर केलेला नाही. यास्तव त्यांना त्यांनी मागितलेली माहिती देता आली नाही. ६) सुवर्ण जयंती शहरी रोजगार नाशिक महानगरपालिका नाशिक या विभागाचे जनमाहिती अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त हे होते. तथापि सदरचे पदरिक्त असल्याने कामकाजाच्या सोयीनुसार श्रीमती प्रेमलता प्रेमानंद कदम कनिष्ठ लिपिक यांना प्रभारी प्रकल्प अधिकारी म्हणून पदभार दिलेला होता. तद्नंतर जा.क्र./आस्था/वशि/४०६८/२०१३ दि.२५/१/२०१३ यांसी आदेश क्र.१८१३ अन्वये सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना या विभागाचा पदभार श्रीमती वसुधा कुरणावळ सहा.आयुक्त यांचेकडेस दि.३०/०४/२०१३ पासून सोपविण्यात आलेला होता. त्यामुळे जन माहिती अधिकारी सहा.आयुक्त हयाच होत्या. ७) द्वितीय अपिल क्र.८६९/२०१३ चा निर्णय दि.२३/०६/२०१४ च्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसाच्या आत अपिल कर्ता यांना मागितलेल्या माहितीचे निरीक्षण करण्यासाठी लेखी तारीख व वेळ कळवावी आणि अपिल कर्ता यांनी त्या तारखेला जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे निरीक्षण करुन घ्यावे असे निर्देश दिले होते. त्यानुसार तक्रारदार यांना दिनांक ०७/०८/२०१४ अन्वये पत्र पाठवून दि.१२/०८/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता मागितलेल्या माहितीच्या अभिलेखाचे निरीक्षण करणेकामी उपस्थित राहणेबाबत कळविले होते. तथापी जन माहिती अधिकारी हया काही अपरिहार्य कारणास्तव सदर दिवशी कार्यालयात उपस्थित राहून शकल्या नाहीत. तथापी त्यांनी लगेच दुसऱ्या दिवशी म्हणजे दि.१३/०८/२०१४ रोजी तक्रारदार यांना कार्यालयात बोलावुन त्यांना अपेक्षित असलेली माहिती अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात आली होती. तथापि त्यांनी जाणून-बुजून माहिती अवलोकनासाठी उपलब्ध करुन न दिल्याचा कंगावा केला आहे. ८) अर्जदार यांनी माझेकडेस माहे फेब्रुवारी सन २०१३ या काळात खंडणीची मागिणी केली होती. त्याबाबत मी पोलीसात रितसर तक्रार दाखल केलेली असून मा.न्यायालयात सदरची केस प्रलंबित आहे. सदर केसमध्ये तक्रारदार यांना शिक्षा होण्याची दाट शक्यता आहे. या कारणास्तव तक्रारदार यांनी पश्चात बुध्दीने सदरचे द्वितीय अपिल दाखल केलेला आहे. ९) संबंधित तक्रारदार यांचा तक्रार क्र.२१/२०१७ बाबत मा.आयोगाकडे दि.१७/०३/२०१७ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी/ तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मला काहीही कळविलेले नसल्यामुळे मी माझी मा.आयोगास समोर बाजू मांडू शकले नाही. १०) सदरची माहिती तक्रारदार यांना त्यावेळेस अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात आली होती. सदर माहितीने तक्रारदार यांचे संपूर्ण समाधान झाले असलेबाबत त्यांनी समक्ष सांगितले होते मात्र माहितीने समाधान झाले असलेबाबत त्यांनी लेखी देण्यास टाळाटाळ केली होती. ही बाब विचारात घेवून सदरचे आदेशा नमुद केलेले रक्कम रु.२५०००/-ची शास्ती करण्यात येवु नये ही विनंती.

४. प्रस्तुत अपिलासंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, आयोगाने द्वितीय अपिल क्र.८६९/२०१३ संदर्भात दि.२३/०६/२०१४ रोजी सुनावणीअंती पारित केलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (मुनिकसं), नाशिक महानगरपालिका नाशिक, यांनी दि.०७/०८/२०१४ च्या पत्रान्वये तक्रारदार यांना मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध अभिलेखाचे निरीक्षण करण्यासाठी दि.१२/०८/२०१४ रोजी उपस्थित राहण्याबाबत कळविल्याचे दिसून येते. त्यानुसार तक्रारदार दि.१२/०८/२०१४ रोजी अवलोकनासाठी उपस्थित राहिल्याचे दिसून येते. त्यानंतर तक्रारदार यांनी दि.१३/०८/२०१४ रोजी आयोगास दिलेल्या अर्जात असे नमूद केले आहे की, प्रकल्प अधिकारी श्रीमती. प्रेमलता कदम यांनी माहिती देण्याचे टाळण्यासाठी दि.१२/०८/२०१४ रोजी सुटी घेतली व मला माहिती दिलेली नाही. तक्रारदार यांच्या

दि.१३/०८/२०१४ च्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने दि.१७/०३/२०१७ रोजी सुनावणी अंती पारित केलेल्या आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी श्रीमती प्रेमलता कदम यांनी आयोगास लेखी खुलासा सादर केला आहे. वास्तविक आयोगाने द्वितीय अपिल क्र.८६९/२०१३ संदर्भात दि.२३/०६/२०१४ रोजी सुनावणीअंती आदेश पारित केला त्यावेळी जन माहिती अधिकारी म्हणून प्रकल्प अधिकारी श्रीमती प्रेमलता कदम या कार्यरत नसून सहाय्यक आयुक्त(मुनिकसं), नाशिक महानगरपालिका या जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत असल्याचे दिसून येते. त्यामुळे तक्रारदार यांनी आयोगाच्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(मुनिकसं) नाशिक महानगरपालिका नाशिक यांना कळविणे आवश्यक होते. तसेच आयोगाने द्वितीय अपिल क्र.८६९/२०१३ मध्ये अवलोकनाअंती रु.२००/- पर्यंतची माहिती पुरविण्याचे आदेश पारित केलेले आहेत. त्याबाबत तक्रारदार यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(मुनिकसं) नाशिक महानगरपालिका यांना कोणती माहिती हवी आहे याबाबत कोणतीही यादी दिल्याचे दिसून येत नसून तक्रारदार केवळ आयोगाच्या आदेशानुसार माहिती दिली नाही असे वारंवार अर्ज करुन नमूद करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे आयोगाने द्वितीय अपिल क्र.८६९/२०१३ संदर्भात पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(मुनिकसं) नाशिक महानगरपालिका यांनी केलेली असून प्रकल्प अधिकारी श्रीमती प्रेमलता कदम यांचेकडून त्या आयोगाच्या आदेशावेळी जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सबब, आयोगाने दि.२३/०६/२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी केली नाही म्हणून आयोगाने तक्रार क्र.२१/२०१७ संदर्भात दि.१७/०३/२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार श्रीमती प्रेमलता कदम यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करणे उचित होणार नाही.

उपरोक्त सर्व वस्तुस्थिती विचारात घेता, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना, नाशिक महानगरपालिका, श्रीमती. प्रेमलता कदम यांनी दि.१२/०५/२०१७ रोजी सादर केलेला खुलासा समर्थनीय असल्यामुळे मान्य करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना, नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक, ता.जि.नाशिक, श्रीमती. प्रेमलता पी.कदम, यांनी सादर केलेला खुलासा मान्य करण्यात येत असून त्यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) नुसार प्रस्तावित असलेली रुपये २५,०००/- शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) वरील आदेशासह प्रस्तुत तक्रार क्र.२१/२०१७/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग
खंडपीठ नाशिक

दिनांक:-

ठिकाण:-

जावक क्र. ७२७९ 18 SEP 2025